सकाळ

अॅग्रोवन

मित्र ग्लोबल शिवाराचा..

कृषी प्रदर्शन २०१८

सहप्रायोजक

Chitale Genus ABS (India) Private Limited

आत्मा जालना

# REGIONAL EXPO-2018 JALNA

---

**19 -21 JAN 2018**

**AT AZAD MAIDAN, JALNA**

# LOGO APPEARANCE IN PROMOTIONAL ADVT-AGROWON



सकाळ अॅग्रोवन | महा-अॅग्रो

शुक्रवार, १९ जानेवारी २०१८ | ३

## मराठवाड्यातील दुष्काळावर 'इस्राईल'ची उपाययोजना

**मुंबई (प्रतिनिधी) :** मराठवाड्यात सातत्याने दुष्काळी परिस्थिती उद्भवते. यावर उपाययोजना करण्यासाठी इस्राईलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट अॅण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत बुधवारी (ता. १७) मंजुरी देण्यात आली.

सतत उद्भवणाऱ्या पाणीटंचाईमुळे २०१६ च्या उन्हाळ्यामध्ये मराठवाड्याला ४००० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करावा लागला होता. याशिवाय तात्पुरत्या पाणीपुरवठा उपाययोजना हाती घ्यावा लागल्या होत्या. या दुष्काळी परिस्थितीवर खात्रीशीर व कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून ग्रामीण तसेच शहरी भागाला पाणीपुरवठा करण्याच्या कायमस्वरूपी उपाययोजनांचा आराखडा आखण्यात येत आहे.

मराठवाड्याची तहान भागवण्यासाठी एकूण १७.९२ टीएमसी एवढ्या पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्व शहरे, गावे व वाड्यांना उपलब्ध असलेल्या पाटबंधारे जलसाठ्यांतून ग्रीड पद्धतीने किंवा इतर मार्गांनी पाणीपुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने मराठवाड्याला ग्रीडद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ६ डिसेंबर २०१६ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. या कंपनीद्वारे उपाययोजना आखण्यासाठी सरासरी पर्जन्यमान, धरणाची साठवण क्षमता, जलसंधारण, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण, नदी खोऱ्यांमध्ये उपलब्ध असणारे पाणी, समुद्राचे पाणी गोडे करणे इत्यादी सर्वंकष प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी इस्राईल सरकारसोबत सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात पुढील प्रक्रिया महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून इस्राईलचे पंतप्रधान व राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या कंपनीशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

### पाणीपुरवठा सक्षम होणार

अत्यंत कमी पर्जन्यमान असूनसुद्धा पाणीपुरवठ्याबाबत सक्षम व्यवस्था उभारण्यात यश आलेल्या मध्य-पूर्वेतील इस्राईलचा अनुभव महाराष्ट्रासाठी उपयोगाचा ठरू शकतो. त्यांच्या याबाबतच्या ज्ञानाचा मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे. मराठवाड्याची पाणीपुरवठ्याची सक्षम व्यवस्था उभारण्यासाठी सहकार्य करण्यासाठी इस्राईल सरकानेही उत्सुकता दाखवली असून इस्राईल शासनाच्या नॅशनल वॉटर कंपनीची उपकंपनी असलेल्या मेकोरोट डेव्हलपमेंट अॅण्ड एंटरप्रायजेस या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली. ही कंपनी इस्राईल सरकारचा स्वत:चा उपक्रम असून इस्राईलमधील ८५ टक्के घरगुती पाण्याची व ७० टक्के पाण्याची मागणी या कंपनीद्वारे पूर्ण केली जाते.

## 'कृषी विद्यापीठांना तंत्रनिकेतनची समस्या कळवू'

**पुणे (प्रतिनिधी) :** कृषी तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना पदवीच्या दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश न देण्याच्या निर्णयाविरुद्ध संतप्त विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेसमोर द्वारसभा घेतली. "विद्यार्थ्यांची समस्या सोडवण्यासाठी सहानुभूतिपूर्वक भूमिका घेण्याबाबत कृषी विद्यापीठांना कळविले जाईल," असे आश्वासन कृषी परिषदेचे महासंचालक आर. एस. जगताप यांनी दिले.

कृषी तंत्रनिकेतनच्या १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी कृषी परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळच सभा घेतली. या वेळी परिषदेचे शिक्षण संचालक डॉ. हरिहर कौसडीकर व विस्तार संचालक डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते. कृषी तंत्रनिकेतनच्या पदविकाधारकांना कृषी पदवीच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश देण्याचा निर्णय राज्य शासनाने १८ जून २०१५ मध्ये घेतला होता. त्यामुळे आता अचानक हा निर्णय रद्द केल्यामुळे २२७ तंत्रनिकेतनमधील आठ हजार विद्यार्थी अडचणीत आलेले आहेत. कृषी पदवीला व्यावसायिक दर्जा देताना तंत्रनिकेतनला वगळण्यात आले. त्यामुळे आता विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाया जाणार आहे, अशी भूमिका विद्यार्थी प्रतिनिधी आनंद लोखंडे यांनी मांडली.

"नव्या नियमानुसार कृषी तंत्रनिकेतनच्या चालू तीन तुकड्यांची अडचण झाली आहे. मुळात हा मुद्दा कृषी विद्यापीठांच्या अखत्यारित आहे. तथापि, याबाबत सहानुभूतिपूर्वक काही बाबींचा फेरविचार करण्यासाठी परिषदेकडून सूचना दिल्या जातील," असे श्री. जगताप म्हणाले. कृषी पदवीच्या दुसऱ्या वर्षासाठी पूर्वीप्रमाणेच तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना पात्र धरावे, अन्यथा दहा लाख रुपये भरपाई द्यावी, श्रेयांक भारात सूट देण्यासाठी अधिष्ठाता समितीने विचार करावा, जून २०१९ मध्ये तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सेमिस्टर पद्धत ठेवावी, अशा मागण्यांचे निवेदन विद्यार्थ्यांनी या वेळी महासंचालकांना दिले.

सर्व प्रकारच्या मूळव्याधींवर फक्त
JOLLY वासीर
जेल आणि कॅप्सूल्स
✓ जीएमपी प्रमाणित
✓ शुद्ध आयुर्वेदिक
✓ पहिल्या दिवसापासून परिणाम
✓ काहीही दुष्परिणाम नाहीत




सर्व प्रमुख मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध । Helpline: 78143-66633

Sakāl Media Group
Print | TV | Digital | Events

सकाळ अॅग्रोवन
कृषी प्रदर्शन २०१८

agrowon Events & Exhibitions

### ज्ञानातून विकासाकडे आणि आधुनिकतेतून समृद्धीकडे नेणारे दर्जेदार कृषी प्रदर्शन

**आजपासून शुभारंभ**

**जालना**
१९ ते २१ जानेवारी २०१८
स्थळ : आझाद मैदान, जालना - ४३१ २०३, वेळ : १० ते ७

प्रदर्शनाला अवश्य भेट द्या

सहप्रायोजक
Chitale Genus ABS (India) Private Limited

**कृषी प्रदर्शन चर्चासत्र वेळापत्रक**

| वार व तारीख | वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| शुक्रवार (ता. १९) | दु. १२ ते २<br>दु. ३ ते ५ | डॉ. एम. बी. पाटील<br>श्री. अजय मोहिते | मोसंबी बहाराचे नियोजन<br>रेशीम शेती व्यवस्थापन व संधी |
| शनिवार (ता. २०) | दु.१२ ते २<br>दु. ३ ते ५ | डॉ. श्रीकांत सटाले<br>डॉ. बी. बी. भोसले | आधुनिक व व्यवसायिक शेळीपालन<br>बोंड अळीचे संकट - त्यावरील उपाय व कीड नियंत्रण |
| रविवार (ता. २१) | दु. १२ ते २<br>दु. ३ ते ५ | श्री. सी. व्ही. कुलकर्णी<br>श्री. हेमंत चव्हाण | मुक्त संचार गोठा आणि मूरघास निर्मिती व दुधाळ जनावर प्रजाती<br>सेंद्रीय शेतीची गरज - मार्केटींग व ब्रॅण्डींग व्यवस्थापन |



एक झकास कृषी प्रदर्शन

**प्रदर्शनात पाहायला मिळेल -** ट्रॅक्टर्स, हार्वेस्टिंग यंत्रे, विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाऊस टेक्नॉलॉजी आणि इम्प्लीमेंट्स, शेडनेट, पॉलिहाऊस, बियाणे उत्पादक टिश्युकल्चर, ठिबक व तुषार सिंचन, पॅकेजिंग आणि कोल्ड स्टोरेज इंडस्ट्रीज, ग्रेडिंग, वेईंग, सोर्टिंग अवजारे उत्पादक कंपन्या, बँका व कृषी शिक्षण संस्था, कृषी साहित्य प्रकाशन, कृषी संशोधन संस्था व शासनाचे व कृषी विभागाचे महिला शेतकरी बचत गट, फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, सेंद्रिय शेतकरी गट, नर्सरी, कृषी आणि 'आत्मा' विभागाचे विविध गट

| शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना | आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार | कृषी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग | परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे, प्रगतशील शेतकऱ्यांचे दररोज मार्गदर्शन |
|---|---|---|---|

**Website** - www.corporate.agrowon.com II www.agrowon.com II www.facebook.com/agrowon

# LOGO APPEARANCE IN PROMOTIONAL ADVT-AGROWON



Marathawada,Nagpur Common

सकाळ अॅग्रोवन | शनिवार, २० जानेवारी २०१८ — अॅग्रो अजेंडा : जमीन सुपीकता — ३

जमीन सुपीकता वर्ष : २०१८

## मृद्संधारणासाठी एकमताने योजना पुढे यावी...

राज्यात आढळणाऱ्या तीन प्रकारच्या जमिनीपैकी अनुत्पादक जमिनी उत्पादकतेत परावर्तित करण्याची गरज आहे. त्यासाठी गाळयुक्त जमिनी करण्याचा प्रयोग परिणामकारक ठरेल. पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी ठिबकचा वापर वाढविण्यासह सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठीचे प्रयोग केल्यास पाटाने पाणी दिल्याने वाईट अवस्था झालेल्या जमिनीचाही पोत सुधारण्यास मोठी मदत होईल. एकीकडे काळ्या खोल जमिनीमध्ये सतत उसासारखे जास्त पाणी लागणारे पीक पाटाने पाणी देऊन घेतल्याने त्या जमिनीची सुपीकता घटली आहे. त्या जमिनींचा सामू आठच्या पुढे गेल्याने त्यामध्ये पीक घेणे मुश्कील झाले आहे. केंद्र व राज्य शासनाने जमीन सुपीकतेसाठीच्या विषयांवर गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मृद्संधारणातील मतमतांतरे दूर करून एकमताने त्याविषयीची योजना पुढे यावी. त्याविषयी बैठका वा चर्चासत्रे घडवून आणली जावीत. कृषी विद्यापीठ, संशोधन संस्थांनी जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठीचे संशोधन पुढे आणावे. ७२ च्या दुष्काळातून धडा घेऊन आपण अन्नधान्यात समृद्ध झालो; परंतु पाण्याचे संकट आपल्यासमोर उभे राहिले. कृषी विस्ताराप्रमाणेच येणाऱ्या वर्षात अॅग्रोवनची राज्याच्या जमीन सुपीकता विषयक भूमिका शेतीत क्रांती घडविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल असा मला विश्वास आहे.

**– डॉ. भगवानराव कापसे,** गटशेतीचे प्रणेते व फळबाग तज्ज्ञ

## योग्य मार्गदर्शनाची गरज

राज्यातील सुपिकतेसंबंधी परिस्थिती चिंताजनक आहे. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले जात नाही. विनानांगरणीची शेती ही मृद संधारणासाठी महत्त्वाची ठरते. अॅग्रोवनने एका महत्त्वाच्या विषयाला हात घातला आहे. येत्या वर्षभरात जास्तीत जास्त माहिती शेतकऱ्यांपर्ययत पोचविण्यासाठी आग्रही रहावे. **– प्रताप चिपळूणकर**

## सॉइल फर्टिलिटी अॅप तयार करावे

जमिनीतील सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास झपाट्याने होत आहे. हा कर्ब ०.८ टक्क्यावरून काही जिल्ह्यांमध्ये अगदी ०.३ टक्क्यावर आला आहे. संकरीत व अधिक उत्पादन देणाऱ्या पीकजातींमुळे तसेच पिकांची घनताही वाढल्यामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे शोषण मोठ्या प्रमाणावर होत आहे. सिंगल सुपर फॉस्फेट खताऐवजी शेतकऱ्यांचा कल डीएपी, फॉस्फोरिक अॅसिड यांच्या वापराकडे वाढला आहे. सुपर फॉस्फेटमधून कॅल्शियम व सल्फर ही अतिरिक्त अन्नद्रव्ये पिकांना मिळत होती. ती मिळण्याचे बंद झाले. पर्यायाने कोकणात कॅल्शियम व देशात सल्फरची कमतरता मोठ्या प्रमाणात दिसते आहे. सेंद्रिय पदार्थांचा वापर कमी झाल्यामुळे सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता पिकांवर दिसू लागली आहे. तसेच उपयुक्त जीवाणूंची संख्याही कमी झाली आहे.संशोधन संस्थांनी विभागनिहाय 'सॉइल फर्टिलिटी' (माती सुपीकता) अॅप तयार केले पाहिजेत. मृदा परीक्षणाची व्यापक मोहीम हाती घ्यावी.अॅग्रोवनने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर नेहमीच आग्रही भूमिका घेतली आहे. धोरणकर्त्यांना त्याबाबत योग्य भूमिका घेण्यास भाग पाडावे.

**– डॉ. अजितकुमार देशपांडे,** मृदा शास्त्रज्ञ

## ...तर दहा वर्षांनी परिणाम...

महाराष्ट्राची शेती आणि शेतकऱ्यांच्या भवितव्यावरच जमीन सुपिकतेने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. मृदा आरोग्य संवर्धनासाठी तत्काळ कामे सुरू केले तरी त्याचे चांगले परिणाम दहा वर्षांनंतर दिसतील. घसरलेला सेंद्रिय कर्ब हाच आपल्या शेती उत्पादकतेचा मुख्य प्रश्न आहे. शेतजमिनीमधील जिवाणू वाढीसाठी शासनाने दीर्घकालीन मोहीम हाती घ्यावी.

राज्याच्या अनेक भागातील जमिनीचा सेंद्रिय कर्ब कमालीचा खाली गेला आहे. शेतकरी, शासन, विद्यापीठे व कृषी विभागाला संयुक्त कार्यक्रम आताच हाती घ्यावा लागेल.अॅग्रोवनने वर्षभर हा विषय मांडण्याचा केलेला संकल्प अभिनंदनास पात्र ठरतो.

**– डॉ. व्यकंट मायंदे,** माजी कुलगुरू


होय..! आम्ही देतो, कमीत कमी एकरी ६ टन जादा ऊस उत्पादनवाढीची हमी.
वेदांत 'अॅग्रोसिल'
(नैसर्गिक सिलिकॉन ८०%)
टीप : राहुरी कृषि विद्यापीठातील प्रयोगानुसार वेदांत अॅग्रोसिलच्या वापराने ऊसाचे उत्पादन हेक्टरी १५ टन तर साखरेचे उत्पादन २.६१ टनांनी वाढले.
साखर उतारा ०.५ % नी वाढला.
वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे तसेच महाराष्ट्रातील सर्वच कृषी विद्यापीठांनी ऊसासाठी प्रती एकरी १६० किलो सिलीकॉन वापरण्याची शिफारस केलेली आहे.
VEDANT AGROSIL
Pingle Pub.
प्रमाण: एकरी १६० किलो वेदांत अॅग्रोसिल जमिनीतून देणे.
वेदांत अॅग्रोटेक, पुणे 9923377103 / 9960502189 9822182575 / 9527714444


## जमीन आरोग्याविषयी कोणाला गांभीर्यच नाही...

महाराष्ट्राचा विचार केल्यास पारंपरिक शहाणपण सोडल्याने जमिनीची सुपीकता नष्ट झाली आणि सेंद्रिय कर्ब ०.४ च्या खाली गेला. सेंद्रिय कर्ब ०.७ पेक्षा अधिक असला पाहिजे. त्याचा परिणाम थेट उत्पादकतेवर झाला आहे. त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेकडे वेळीच लक्ष न दिल्याने त्याचा परिणाम निसर्गावर देखील झाला आहे. वातावरणातील बदल हे त्याचेच द्योतक आहे. त्यामुळे शेतीला झाडांसोबत जोडणे गरजेचे आहे. त्याशिवाय शेती आणि मातीचे संवर्धन शक्य नाही. शेतातील झाडे तोडल्याचा परिणाम पर्यावरण आणि जमिनीच्या आरोग्यावर देखील झाल्याचे माझे निरीक्षण आहे. मृद्संधारणाच्या योजना पुरेशा असत्या तर सेंद्रिय कर्बाची स्थिती चिंताजनक झाली असती काय?

शेतकऱ्यांच्या शेतावर मृद्संधारण संदर्भाने झालेल्या प्रयोगांची दखल आजवर कृषी विद्यापिठांच्याकडून घेण्यात आली नाही. त्यामुळे जमीन आरोग्य हा विषयच दुर्लक्षित राहिला. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने मृद्संधारणाच्या क्षेत्रात शेतकऱ्यांनी केलेल्या कामांचे मूल्यमापन करावे. त्याआधारे अशा शेतकऱ्यांच्या शेतांना संशोधक संस्था, विद्यापीठ तज्ज्ञांच्या भेटीचा कार्यक्रम व्हावा. त्यातील जमिनीचे आरोग्य राखण्यासाठी त्या शेतकऱ्याने केलेल्या संशोधनात्मक व इतर कामांचा प्रचार, प्रसार झाला पाहिजे. त्याकरिता संशोधक संस्थांमधील तज्ज्ञांनी अहंकाराचा चष्मा काढून ठेवणे गरजेचे आहे.

शासन तसेच संशोधनात्मक पातळीवर जमिनीचे आरोग्य हा विषय आजवर गांभीर्याने घेतलाच गेला नाही. या प्रश्नाकडे 'अॅग्रोवन'सारख्या भक्कम माध्यमाने लक्ष दिल्याने गेल्या ७० वर्षांत झाले नसेल तितके काम येत्या वर्षभरात होईल, असे वाटते. अॅग्रोवनने आजवर शेतकरीहिताचे अनेक धोरणात्मक बदल करण्यास सरकारला बाध्य केले आहे. जमीन आरोग्याच्या प्रश्नावरही सरकारला धोरणात्मक निर्णय अॅग्रोवनमुळे घ्यावे लागतील, असे वाटते. यातून जमिनीच्या आरोग्याशी निगडित प्रश्न सुटतील, अशी अपेक्षा आहे.

**– सुभाष शर्मा, प्रयोशील शेतकरी**


तंदुरुस्त राहा, देखणे दिसा
फक्त १ कॅप्सूल सकाळी आणि १ संध्याकाळी घ्या
शुद्ध आयुर्वेदिक, भारतीय आयुर्वेद मंत्रालयाद्वारे प्रमाणित.
जलद परिणाम.
कोणताही साईड इफेक्ट नाही.
पुरुष आणि महिलांसाठी अत्यंत प्रभावी.
FAT-GO SLIMMING CAPSULES
JOLLY FAT-GO
स्लिमिंग कॅप्सूल्स, पावडर आणि तेल
खरेदी करा 2 जॉली फॅट गो चे पॅक आणि 1 जॉली ऑरगॅनिक ग्रीन टी बॉक्स मिळवा. (किंमत रु.177/-) Free
सर्व अग्रगण्य मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध | Helpline: 78143-66633



Sakāl Media Group
Print | TV | Digital | Events
agrowon Events & Exhibitions
सकाळ अॅग्रोवन
कृषी प्रदर्शन २०१८
एक झकास कृषी प्रदर्शन
सहप्रायोजक
Chitale Genus ABS (India) Private Limited
प्रदर्शनाला अवश्य भेट द्या
प्रदर्शनाचा आज दुसरा दिवस
जालना
१९ ते २१ जानेवारी २०१८ | स्थळ : आझाद मैदान, जालना | वेळ : १० ते ७
ज्ञानातून विकासाकडे आणि आधुनिकतेतून समृद्धीकडे नेणारे दर्जेदार कृषी प्रदर्शन
कृषी प्रदर्शन चर्चासत्र वेळापत्रक

| वार व तारीख | वेळ | वक्ते | विषय |
| --- | --- | --- | --- |
| शनिवार (ता. २०) | दु.१२ ते २<br>दु. ३ ते ५ | डॉ. श्रीकांत सटाले<br>डॉ. बी. बी. भोसले | आधुनिक व व्यवसायिक शेळीपालन<br>बोंड अळीचे संकट, त्यावरील उपाय व कीड नियंत्रण |
| रविवार (ता. २१) | दु. १२ ते २<br>दु. ३ ते ५ | श्री. सी. व्ही. कुलकर्णी<br>श्री. हेमंत चव्हाण | मुक्त संचार गोठा आणि मूरघास निर्मिती व दुधाळ जनावर प्रजाती<br>सेंद्रीय शेतीची गरज - मार्केटींग व ब्रॅण्डींग व्यवस्थापन |

प्रदर्शनात पाहायला मिळेल – ट्रॅक्टर्स, हार्वेस्टिंग यंत्रे, विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाऊस टेक्नॉलॉजी आणि इम्प्लीमेंट्स, शेडनेट, पॉलिहाऊस, बियाणे उत्पादक टिश्युकल्चर, ठिबक व तुषार सिंचन, पॅकेजिंग आणि कोल्ड स्टोरेज इंडस्ट्रीज, ग्रेडिंग, वेईंग, सोर्टिंग अवजारे उत्पादक कंपन्या, बँका व कृषी शिक्षण संस्था, कृषी साहित्य प्रकाशन, कृषी संशोधन संस्था व शासनाचे व कृषी विभागाचे महिला शेतकरी बचत गट, फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, सेंद्रिय शेतकरी गट, नर्सरी, कृषी आणि 'आत्मा' विभागाचे विविध गट
शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना
आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार
कृषी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग
परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे, प्रगतशील शेतकऱ्यांचे दररोज मार्गदर्शन
Website - www.corporate.agrowon.com II www.agrowon.com II www.facebook.com/agrowon

# COMPANY NAME IN PROMOTIONAL NEWS ALONG WITH LOGO APPEARANCE IN AGROWON



## चला जालन्याला... अॅग्रोवनच्या कृषी प्रदर्शनाला...

### शुक्रवारपासून प्रारंभ; शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांसाठी पर्वणी | कृषी ज्ञान-तंत्रज्ञान, उत्पादन माहितीचे दालन होणार खुले

**जालना (प्रतिनिधी) :** शेतकऱ्यांसह सर्वांचीच उत्सुकता लागून असलेल्या सकाळ -अॅग्रोवनच्या कृषी प्रदर्शनाला उद्योगनगरी म्हणून ख्याती असलेल्या जालना शहरात शुक्रवारी (ता. १९) प्रारंभ होत आहे. शेतकरी व संबंधित क्षेत्राला ज्ञानातून विकासाकडे आणि आधुनिकतेतून समृद्धीकडे नेण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून केला जाणार असल्याने शेतकऱ्यांसह सर्वांसाठी ही मोठी पर्वणी राहणार आहे.

सकाळ-अॅग्रोवनच्या माध्यमातून कृषी क्षेत्राला विकासाच्या दिशेने नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. शेतकऱ्यांना शेती व पूरक क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाशी अवगत करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून जालन्यात आयोजित कृषी प्रदर्शनाकडे पाहिले जात आहे. मे. बी.जी. चितळे आणि चितळे जिनस एबीएस इंडिया, कृषी विभाग जालना, आत्मा जालना या प्रदर्शनाचे सहप्रायोजक आहेत.

शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना असणाऱ्या या कृषी प्रदर्शनात आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार पाहायला मिळणार आहे. हे प्रदर्शन म्हणजे ज्ञान व माहितीचा एकप्रकारे खजीनाच असणार आहे. प्रदर्शनाच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे प्रगतिशील शेतकऱ्यांचे मार्गदर्शनही प्रदर्शनाला भेट देणाऱ्या व सहभागी होणाऱ्यांना दररोज लाभणार आहे.

#### प्रदर्शनात हे बघता येईल

या प्रदर्शनाच्या माध्यमातून तंत्रज्ञान व कृषिविषयक उत्पादनाच्या विविध कंपन्या शेतकऱ्यांच्या भेटीला येत आहेत. यामध्ये ट्रॅक्टर्स, हार्वेस्टिंग यंत्रे, विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाउस टेक्नॉलॉजी आणि इंप्लीमेंट्स, बियाणे उत्पादक टिश्युकल्चर, ठिबक व तुषार सिंचन, पॅकेजिंग आणि कोल्ड स्टोरेज इंडस्ट्रीज, ग्रेडिंग,वेईंग, सोर्टिंग अवजारे उत्पादक कंपन्या, कृषी साहित्य प्रकाशन, कृषी संशोधन संस्था सहभागी होत आहेत.

अॅग्रोवन कृषी प्रदर्शन २०१८

सहप्रायोजक

Chitale Genus ABS (India) Private Limited

#### तीन दिवस चालणार प्रदर्शन

जालन्यातील नगरपालिकेच्या आझाद मैदानावर १९ ते २१ जानेवारीदरम्यान तीन दिवस हे प्रदर्शन होणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेदरम्यान हे प्रदर्शन शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांसाठी खुले राहणार आहे.

## विमा हप्त्याची रक्कम गेली कुठे

### दोन-अडीच वर्षांपासून शोध लागेना; बँक, विमा कंपनीचे दावे-प्रतिदावे

**अकोला (प्रतिनिधी) :** 'शासकीय काम, सहा महिने थांब' अशी एक उपरोधिक म्हण प्रचलित झालेली आहे. यातून शासनाच्या संथ कामकाज शैलीवर बोट ठेवले जाते. याचा कटू अनुभव काळेगाव येथील शेतकरी सहा महिनेच नव्हे तर गेली दोन-अडीच वर्षे घेत आहेत.

२०१३-१४ मध्ये रब्बी हंगामात खामगाव तालुक्यात गहू व हरभरा पिकाला विमा मंजूर झाला; मात्र काळेगावातील शेतकऱ्यांना अद्यापही विमा मिळाला तर नाहीच, शिवाय आपण भरलेली विमा हप्ता रक्कमसुद्धा नेमकी कुठे गेली याचा शोध लागलेला नाही. मजेशीर बाब म्हणजे शेतकऱ्यांनी खामगाव येथे बँक शाखेत भरलेली रक्कम संबंधित शाखेने त्यांच्या विभागीय कार्यालयाकडेसुद्धा पाठवली. परंतु विमा कंपनीला हे पैसेच मिळाले नसल्याचे संबंधित कंपनीने सांगितले. याबाबत शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे व कृषी विभागाने बँक आणि विमा कंपनीकडे वेळोवेळी पाठपुरावा करूनही काहीही झालेले नाही.

खामगाव तालुक्यातील काळेगाव मंडळात २०१३-१४ च्या रब्बी हंगामात गहू व हरभरा पिकाला विमा मंजूर झाला होता. आपल्याला मदत मिळेल म्हणून त्यावेळी शेतकरी आनंदी झाले होते. याच गावातील काही शेतकऱ्यांना ज्यांनी दुसऱ्या बँकेत विमा रक्कम भरली त्यांना मदतही मिळाली. परंतु ज्यांनी बँक ऑफ इंडियाच्या खामगाव शाखेत विमा रक्कम भरली त्यांना अद्यापही हा लाभ मिळाला नाही. शेतकऱ्यांनी याबाबत कृषी विभागाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर विमा रकमेचा शोध सुरू झाला. कृषी विभागाने बँक शाखा व्यवस्थापकाला तसेच विमा कंपनीकडे विचारणा केली. बँक व्यवस्थापकाने शेतकऱ्यांना माहिती देताना आपल्या झोनल ऑफिसमार्फत ३१ डिसेंबर २०१३ ला विमा कंपनीला डीडीद्वारे ३७११ रुपये पाठवले, असे लेखी कळवले.

दुसरीकडे विमा कंपनीनेही कृषी विभागाला पत्र देत बँकेकडून कोणत्याही प्रकारची पीकविमा हप्ता रक्कम प्राप्त झाली नसल्याचे लेखी कळवले. बँकेकडून विमा हप्ता पाठवल्याचा दावा केला जातो तर विमा कंपनी कुठलाही हप्ता रक्कम बँकेकडून मिळाली नसल्याचे सांगत आहे. गेले दोन वर्षे हे प्रकरण रेंगाळलेले आहे. या संदर्भात काळेगाव येथील गोपाल दामोदर साठे व ४६ शेतकऱ्यांनी ठिकठिकाणी निवेदने दिली. पाठपुरावा केला. मात्र काहीही झालेले नसल्याचे समोर आले आहे.

## सूक्ष्म सिंचन संच न बसविणाऱ्या शेतकऱ्यांना वगळणार

**पुणे (प्रतिनिधी) :** प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेत पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना ३१ मेपर्यंत ठिबक संच न बसविल्यास यादीतून त्यांचे नाव वगळले जाणार आहे. ऑनलाइन अर्जाची मुदतदेखील १५ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे.

सूक्ष्म सिंचन योजनेसाठी निधीचा तुटवडा नसल्याने ऑनलाइन अर्जाचा कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाने राज्य शासनाकडे पाठविला होता. हा प्रस्ताव स्वीकारण्यात आला आहे. "ठिबकसाठी चालू वर्षात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्याला ५५ टक्के तर इतर शेतकऱ्यांना सरसकट ४५ टक्के अनुदान मिळणार आहे. मूळ योजनेनुसार अर्जाची मुदत नोव्हेंबरमध्येच समाप्त झाली होती. मात्र, आता १५ मार्चपर्यंत शेतकऱ्यांचे ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिली आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

राज्याचे कृषी उपसचिव श्रीकांत आंडगे यांनी फलोत्पादन संचालक प्रल्हादराव पोकळे यांना पाठविलेल्या पत्रानुसार पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना पुढील पाच महिन्यांच्या आत ठिबक संच बसविणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे." ई-ठिबक प्रणालीवर २०१७-१८ मधील ऑनलाइन कामकाजाकरिता अर्जासाठी मुदतवाढ देण्यात आलेली असली तरी १५ मार्चपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांना कृषी अधिकाऱ्यांनी ३१ मार्चपर्यंतच पूर्वसंमती द्यावी. त्यानंतरची शेतकऱ्यांची यादी २०१८-१९ मधील कामकाजात टाकली जाणार आहे. मात्र, या शेतकऱ्यांना ३१ मेपर्यंत संच घ्यावे लागतील, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

"कृषी अधिकाऱ्यांनी पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांनी मुदतीत ठिबक संचाची उभारणी न केल्यास अशा शेतकऱ्यांची नावे २०१८-१९ मधील कामकाजातून वगळली जातील. त्यामुळे शेतकऱ्यांनी संचाची कामे नियोजनानुसार वेळेत करणे क्रमप्राप्त आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

तंदुरुस्त राहा, देखणे दिसा
फक्त १ कॅप्सूल सकाळी आणि १ संध्याकाळी घ्या




शुद्ध आयुर्वेदिक, भारतीय आयुर्वेद मंत्रालयाद्वारे प्रमाणित.
जलद परिणाम.
कोणताही साईड इफेक्ट नाही.
पुरुष आणि महिलांसाठी अत्यंत प्रभावी.

JOLLY FAT-GO
स्लिमिंग कॅप्सूल्स, पावडर आणि तेल
खरेदी करा 2 जॉली फॅट गो चे पॅक आणि 1 जॉली ऑरगॅनिक ग्रीन टी बॉक्स मिळवा. (किंमत Rs. 177/-) फ्री
सर्व अग्रगण्य मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध | Helpline: 78143-66633

दोन वर्षाच्या यशस्वी आयोजनानंतर तिसऱ्या वर्षी शेतकरी बांधवांसाठी
घेऊन येत आहोत११० एकरावरील भारतातील सर्वात मोठे
प्रात्यक्षिकेयुक्त कृषि प्रदर्शन
कृषिक




सशुल्क प्रवेश १९, २० आणि मोफत प्रवेश २१, २२ जानेवारी २०१८

Krushik App: शेतकऱ्यांसाठी मोफत कृषिक अॅप (कृषि आधुनिक तंत्रज्ञान माहिती आपल्या मोबाईलमध्ये अॅप डाऊनलोड करण्यासाठी प्ले स्टोअर मध्ये जाऊन कृषिक किंवा krushik सर्च केल्यास अॅप इन्स्टॉल करता येईल)
Email: kvkbmt@yahoo.com | Phone : 02112 - 255427

• प्रात्यक्षिके • शेतीतील यांत्रिकीकरण
• नविन कृषि तंत्रज्ञान • पशुपक्षी प्रदर्शन
• नेदरलँड तंत्रज्ञानावर आधारित भारतातील पहिले भाजीपाला गुणवत्ता केंद्र

आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने गौरवलेली अग्रगण्य संस्था..
सहाय्य: आयोजक: प्रायोजक: SBI

स्थळ: अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे कृषि विज्ञान केंद्र, बारामती, माळेगाव खुर्द, ता. बारामती जि. पुणे

# COMPANY NAME IN PROMOTIONAL NEWS ALONG WITH LOGO APPEARANCE IN AGROWON



## प्रतीक्षा संपली... आजपासून जालन्यात ॲग्रोवनचे कृषी प्रदर्शन

**जालना (प्रतिनिधी) :** सर्वांना उत्सुकता लागून असेलल्या सकाळ -ॲग्रोवनच्या कृषी प्रदर्शनाला उद्योग नगरी म्हणून ख्याती असलेल्या जालना शहरात शुक्रवारी (ता.१९) प्रारंभ होत आहे. शेतकऱ्यांसह कृषी उद्योगासाठी हे प्रदर्शन सर्वात पर्वणी ठरणार आहे.

शेतकऱ्यांना शेती व पूरक क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाशी अवगत करत कृषी क्षेत्राला विकासाच्या दिशेने नेण्याच्या दृष्टीने सकाळ - ॲग्रोवनच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून जालन्यात कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मे. बी. जी. चितळे आणि चितळे जिनस एबीएस इंडिया तसेच कृषी विभाग जालना व आत्मा जालना या प्रदर्शनाचे सहप्रायोजक आहेत. सतत दुसऱ्या वर्षी जालन्यातील आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे दुपारी १ वाजता उद्‌घाटन होणार आहे.

या वेळी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सतीष टोपे, नगराध्यक्षा संगीता गोरंट्याल, माजी आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे, जालन्याचे अधीक्षक कृषी अधिकारी दशरथ तांभाळे, जालन्याचे आत्माचे प्रकल्प संचालक संतोष आळसे आदींची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. या कृषी प्रदर्शनात आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार शेतकऱ्यांना पहायला मिळणार आहे.

ॲग्रोवनचे कृषी प्रदर्शन म्हणजे शेतकऱ्यांसाठी ज्ञान व माहितीचा एकप्रकारे खजिनाच असणार आहे.

### तीन दिवस चालणार प्रदर्शन

**यंदा सलग दुसऱ्या वर्षी जालन्यातील नगरपालिकेच्या आझाद मैदानावर १९ ते २१ जानेवारी दरम्यान तीन दिवस हे प्रदर्शन होणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेदरम्यान हे प्रदर्शन शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांसाठी खुले राहणार आहे.**

सहप्रायोजक

Chitale Genus ABS (India) Private Limited

### ॲग्रोवन प्रदर्शनात या विषयांचा समावेश

या प्रदर्शनाच्या माध्यमातून तंत्रज्ञान व कृषीविषयक उत्पादनाच्या माध्यमातील विविध कंपन्या शेतकऱ्यांच्या भेटीला येत आहेत. यामध्ये ट्रॅक्टर्स, हार्वेस्टींग यंत्रे, विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाउस टेक्नॉलॉजी आणि इंप्लिमेंट्स, बियाणे उत्पादक टिश्युकल्चर, ठिबक व तुषार सिंचन, पॅकेजिंग, ग्रेडिंग, वेईंग, सोर्टींग अवजारे उत्पादक कंपन्या, बँका, कृषी साहित्य प्रकाशन, कृषी संशोधन संस्था, शासनाच्या व कृषी विभागाचे महिला शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, सेंद्रिय शेतकरी गट, नर्सरी आणि कृषी विभागाचे व आत्माचे विविध गट सहभागी होत आहेत.

### अशी असतील चर्चासत्रे

**१९ जानेवारी २०१८**

**पहिले चर्चासत्र : वेळ : दुपारी १२ ते २**
**विषय :** मोसंबी बहाराचे नियोजन
**वक्ते :** डॉ. एम. बी. पाटील, प्रमुख फळबाग संशोधन केंद्र हिमायतबाग, औरंगाबाद.

**दुसरे चर्चासत्र : वेळ : दुपारी ३ ते ५**
**विषय :** रेशीम शेती व्यवस्थापन व संधी
**वक्ते :** अजय मोहिते प्रकल्प अधिकारी जिल्हा रेशीम कार्यालय औरंगाबाद.

**२० जानेवारी २०१८**

**पहिले चर्चासत्र : वेळ : दुपारी १२ ते २**
**विषय :** आधुनिक व व्यावसायिक शेळीपालन
**वक्ते :** डॉ. श्रीकांत सटाले, पशुवैद्यक औरंगाबाद.

**दुसरे चर्चासत्र : वेळ : दुपारी ३ ते ५**
**विषय :** बोंड अळीचे संकट, त्यावरील उपाय व कीड नियंत्रण
**वक्ते :** डॉ. बी. बी. भोसले, माजी विस्तार शिक्षण संचालक वनामकृवी तथा प्राचार्य कृषी महाविद्यालय लातूर.

**२१ जानेवारी २०१८**

**पहिले चर्चासत्र : वेळ : दुपारी १२ ते २**
**विषय :** मुक्त संचार गोठा, मुरघास निर्मिती व दुधाळ जनावर प्रजाती
**वक्ते :** श्री. चंद्रशेखर वसंत कुलकर्णी

**दुसरे चर्चासत्र : वेळ : दुपारी ३ ते ५**
**विषय :** सेंद्रिय शेतीची गरज -मार्केटिंग व ब्रँडिंग व्यवस्थापन
**वक्ते :** श्री. हेमंत चव्हाण.

## फळबाग लागवडीतील मर्यादा हटविण्यासाठी प्रयत्न करू

### पाशा पटेल : आंबा लागवड ते निर्यात पुस्तकाचे प्रकाशन

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** हवामान बदलाच्या संकटाचा सामना करताना पडीक जमीन हरित होणे आवश्यक आहे. त्यासाठी रोहयो व मनरेगाअंतर्गत फळबाग लागवडीसाठीची मर्यादा आहे, ती रद्द करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी स्पष्ट केले.

औरंगाबाद येथील जनजागृती प्रतिष्ठानच्या कार्यालयाला नुकतीच श्री. पटेल यांनी भेट दिली. त्यांच्या हस्ते गटशेतीचे प्रवर्तक फळबाग तज्ज्ञ डॉ. भगवानराव कापसे लिखित 'आंबा-लागवड ते निर्यात' या पुस्तकाचे त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी पळशी, डोणवाडा, पिसादेवी, आडगाव येथील उपस्थित शेतकऱ्यांशी श्री. पटेल यांनी संवाद साधला.

मनरेगा, रोहयोंतर्गत फळबाग लागवडीमध्ये जी अडीच हेक्टरची मर्यादा आहे ती काढूण टाकण्याची मागणी शेतकऱ्यांनी श्री. पटेल यांच्याकडे केली. यासंदर्भात उत्तर देताना मनरेगाच्या केंद्रीय समितीच्या दहा सदस्यांपैकी एक असलेल्या श्री. पटेल यांनी येत्या २९ जानेवारीला दिल्लीत होणाऱ्या बैठकीत हा मुद्दा आपण प्राधान्याने मांडू, असे सांगितले.

यावेळी गटशेती, त्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विकास, शेतीमधील सार्वजनीक भागीदारी या संकल्पनेवर आधारीत कामे, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, गटाने फळबाग लागवड, निर्यातयोग्य मालाचे उत्पादन, पुढील वर्षी कापूस शेतीचे भवितव्य याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी कृषिमूल्य आयोग अध्यक्षांचे सल्लागार उदय देवळाणकर, डॉ. एस. एस. माने, फळप्रक्रिया तज्ज्ञ डॉ. भगवान साखळे, शिवाजी उगले, जनजागृती प्रतिष्ठानचे सचिव विकास कापसे, शेतकरी नवनाथ काकडे, रामदास पठाडे, रामेश्वर पळसकर, पांडुरंग ठोंबरे, नीतेश कुबेर, रविराज खिल्लारी, रामप्रसाद बिडवे आदींची उपस्थिती होती. मान तालुक्यात जवळपास सत्तावीसशे एकर खासगी जमीन पडीक दिसली. या जमिनीवर सीताफळासारखी अत्यल्प पाण्यावर येणाऱ्या फळपिकाची बाग उभी राहिल्यास राज्यातील जमीन हरित होण्यास हातभार होऊ शकतो. अशी राज्याच्या विविध भागात पडीक असलेली जमीन हरित झाल्यास पर्यावरणाचा होणारा ऱ्हासही थांबविता येऊ शकतो. मनरेगा, रोहयोअंतर्गत अडीच हेक्टरची मर्यादा हटविल्यास ते शक्य होऊ शकते. त्यामुळे आपण दिल्लीतील बैठकीत हा मुद्दा प्राधान्याने मांडून सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे श्री. पटेल यांनी ॲग्रोवनशी बोलताना सांगितले.

## मोसंबीवर मावा किडीचा प्रादुर्भाव

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** मोसंबीवर मावा व चिकटाचा प्रादूर्भाव वाढला आहे. दरवर्षीपेक्षा यंदा हे प्रमाण जास्त असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. हवामान बदलामुळे हे प्रमाण वाढले असून त्याचा परिणाम मोसंबीच्या कोनी फूटण्यावर होत असल्याचे शेतकरी सांगतात.

मराठवाड्यात मोसंबीचे सर्वाधिक क्षेत्र जालना व औरंगाबाद जिल्ह्यात आहे. या मोसंबी उत्पादकांपैकी जवळपास ७० टक्के शेतकरी आंबे बहार घेतात तर जवळपास ३० टक्के शेतकरी मृग बहाराचे नियोजन करतात. यंदा मृग बहाराच्या नियोजन करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागले. अचानक पाऊस, वा पावसाची प्रदीर्घ दडी यामुळे शेतकऱ्यांचे आंबे बहाराचे नियोजन कोलमडले. त्यातच वातावरणातील इतर बदलांनीही नियोजन कोलमडविण्यात हातभार लावल्याचे शेतकरी सांगतात. तुर्त शेतकऱ्यांचे आंबे बहराचे नियोजन सुरू असताना त्यावर मावा व चिकटा चा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. खासकरून पैठण तालुक्यातील मोसंबीवर हे प्रमाण अधिक आहे. साधारणपणे फूल लागण्याच्या अवस्थेत हा मावा येतो परंतू त्यांचे प्रमाण यंदा जास्त आहे. मावा व चिकटा च्या प्रादूर्भावामुळे निघणारी ''कोणी'' पीवळी व त्यानंतर काळी पडत असल्याचे शेतकरी सांगतात. त्याचा थेट परिणाम मोसंबीच्या बहार फूटण्यावर होउन अपेक्षेच्या तुलनेत यंदा आंबे बहाराचे उत्पादणातही फटका बसेल अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.



**औरंगाबाद : देवगाव येथील शहादेव ढाकणे यांच्या बागेतील मोसंबीवर आलेला चिकटा व मावा.**



**औरंगाबाद : देवगाव येथील शहादेव ढाकणे यांच्या बागेतील मोसंबीवर आलेला मावा.**

# COMPANY NAME IN PROMOTIONAL NEWS ALONG WITH LOGO APPEARANCE- AGROWON

Aurangabad, nanded, Nagpur, akola



● Date of Publication : शनिवार, २० जानेवारी २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily. आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-2020/RNI No.14922

जमीन सुपीकता वर्ष : २०१८



जालना : जालना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर अॅग्रोवन प्रदर्शनाचे उद्घाटन करताना. या वेळी उपस्थित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दशरथ तांभाळे, फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, आत्माचे प्रकल्प संचालक संतोश आळसे, सकाळच्या मराठवाडा आवृत्तीचे उपसरव्यवस्थापक रमेश बोडके व इतर शेतकरी.

## कृषी तंत्रज्ञानाचे दालन झाले खुले

### सकाळ-अॅग्रोवनच्या कृषी प्रदर्शनास उत्साहात प्रारंभ

### पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

**जालना (प्रतिनिधी) :** सर्वांची उत्सुकता लागून असलेल्या सकाळ-अॅग्रोवनच्या कृषी प्रदर्शनाला शुक्रवारी (ता. १९) जालना येथील आझाद मैदानावर प्रारंभ झाला. प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर यांनी केले.

उद्घाटन सत्राला माजी मंत्री राजेश टोपे, आत्माचे प्रकल्प संचालक संतोष आळसे, जिल्हा अधीक्षक अधिकारी कृषी दशरथ तांभाळे, सकाळच्या मराठवाडा आवृत्तीचे उपसरव्यवस्थापक रमेश बोडके, औरंगाबाद येथील फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, औरंगाबाद रेशीम कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी अजय मोहिते, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे अध्यक्ष मनोज मरकड आणि मे. बी. जी. चितळे डेरीचे पशुतज्ज्ञ चंद्रशेखर कुलकर्णी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मे. बी. जी. चितळे आणि चितळे जिनस एबीएस इंडिया तसेच कृषी विभाग जालना व आत्मा जालना या प्रदर्शनाचे सहप्रायोजक आहेत.

पहिल्याच दिवशी प्रदर्शनातील दालनास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने भेटी दिल्या. चर्चासत्रासदेखील उदंड प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनामध्ये एकूण ७८ दालने असून, यामध्ये यांत्रिक अवजारे, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीनहाउस तंत्रज्ञान, शेडनेट, पॉलिहाउस तंत्रज्ञान, बियाणे उत्पादक, ठिबक, तुषार संच, पॅकेजिंग, कोल्ड स्टोरेज उद्योग, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, रोपवाटिका, कृषी प्रकाशने, पूरक उद्योग आदी दालनांचा समावेश आहे. सांयकाळपर्यंत मराठवाड्यासह विदर्भातील शेतकऱ्यांची प्रदर्शनाला भेट देण्यासाठी वर्दळ सुरू होती. याप्रसंगी कृषी अधीक्षक तांभाळे म्हणाले, की शेतीमध्ये मनुष्यबळ मिळत नाही, त्यामुळे यांत्रिक शेतीकडे शेतकऱ्यांनी वळणे गरजेचे आहे. या प्रदर्शनामध्ये सर्व यांत्रिक उपकरणे उपलब्ध आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन या वेळी त्यांनी केले.

